**डीएवाय-एनआरएलएमची मुख्य लक्षणे**

(1) **सर्वव्यापक सामाजिक** चालना :- सुरुवात म्हणून, डीएवाय-एनआरएलएम खात्री करुन घेईल की, ओळखण्यात आलेल्या प्रत्येक गरीब घरातील किमान एक व्यक्ती (शक्यतो महिला) कालबध्द रितीने, स्वयंसेवा गटात (एसएचजी) आणली जात आहे.

त्यानंतर, उपजीविकेचे प्रश्न सोडविण्यासाठी, पुरुष व महिलांनाही संघटित केले जाईल - उदा. शेतक-यांच्या संघटना, दुग्ध-उत्पादकांच्या सहकारी संस्था, विणकरांचे संघ इत्यादि. ह्या सर्व संस्थांचा ह्यात समावेश असून त्यात कोणत्याही गरीब व्यक्तीला वगळले जाणार नाही. डीएवाय-एनआरएलएम खात्री करुन घेईल की, समाजातील मर्मभेदक भागही ह्यात पुरेशा प्रमाणात समाविष्ट केले जात आहेत; अशा प्रकारे की, स्वयं समाविष्ट निकषाखालील 100% कुटुंबे हे अंतिम उद्दिष्ट ठेवून आणि सोशियो-इकॉनॉमिक अँड कास्ट सेन्ससनुसार (एसईसीसी) किमान एका वंचित निकषासह, त्यातील 50% लाभार्थी एससी/एसटीमधील असतील. 15% अल्पसंख्याक असतील व 3% व्यक्ती अपंगत्व असलेल्या असतील.

(2) **सहभागी गरीबांची ओळख (पीआयपी)** :- एसजीएसवाय मधून मिळालेला अनुभव सूचित करतो की, बीपीएलच्या विद्यमान यादीत, समावेश व वगळले जाणे ह्यात अनेक चुका झाल्या आहेत. बीपीएलच्याही पलिकडे उद्दिष्ट-गटांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि आणि सोशियो इकॉनॉमिक अँड कास्ट सेन्सस (एसईसीसी) नुसार किमान एका वंचित निकषासह गरजू असलेल्या सर्व गरीबांचा समावेश करण्यासाठी, डीएवाय-एनआरएलएम, समाज/जमात आधारित प्रक्रिया अनुसरेल - म्हणजे, उद्दिष्ट केलेल्या गटाच्या ओळख-प्रक्रियेत गरीबांचा सहभाग करणे. बळकट कार्यरीती व साधने (*सोशल मॅपिंग आणि वेल बिईंग वर्गीकरण, वंचित केल्याजाण्याबाबतचे निर्देशक*), आणि त्याचप्रमाणे, स्थानिक स्तरावर स्वीकारण्यात आलेले निकष, ह्यांच्या आधारावर घेतलेली प्रक्रिया, ह्यामुळे स्थानिक जाणीव निर्माण होते व त्यामुळे, समावेश व वगळले जाणे. ह्यामधील चुका कमी होतात आणि परिणामी, परस्पर सौहार्दाच्या धर्तीवर गट तयार होण्यास मदतच होते. गेल्या अनेक वर्षांमध्ये, गरीबांची ओळख पटविण्याची सहभागी रीत विकसित करण्यात आली असून, ती रीत, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू व ओरिसा ह्यासारख्या राज्यांमध्ये यशस्वी रीतीने लागु करण्यात आली आहे.

ह्या पी.आय.पी. प्रक्रियेद्वारा आणि सोशियो इकॉनॉमिक अँड कास्ट सेन्सस (एसईसीसी) नुसार किमान एका वंचित निकषासह गरीब म्हणून ओळखण्यात आलेली घरे, डीएवाय-एनआरएलएमच्या उद्दिष्ट गटांमध्ये स्वीकारण्यात आली असून, ती घरे, ह्या कार्यक्रमाखालील लाभांसाठी पात्र असतील. पीआयपी प्रक्रियेनंतर अंतिम स्वरुप दिलेल्या यादीची पडताळणी ग्रामपंचायतीकडून केली जाईल व ग्रामपंचायतीकडून मंजुर केली जाईल.

एखाद्या विशिष्ट जिल्ह्यात/ब्लॉकमध्ये, राज्य सरकारकडून ही पीआयपी प्रक्रिया केली जाईपर्यंत, एसईसीनुसार किमान एक वंचित निकष असलेली ग्रामीण घरांना, डीएवाय-एनआरएलएमखाली उद्दिष्ट केले जाईल. डीएवाय-एनआरएलएमची अंमलबजावणी करण्याच्या साचामध्ये आधीच दिल्यानुसार, एसएचजींच्या एकूण सभासदांच्या 30% पर्यंतचे सभासद, दारिद्र्य रेषेच्या थोड्या वरच्या स्तरावरील लोकसंख्येमधील असू शकतात - मात्र ह्यासाठी, त्या गटातील बीपीएल सभासदांनी मंजुरी दिलेली असावी. ह्या 30% मध्ये, एसईसीसी यादीत समाविष्ट असलेले परंतु त्या यादीत नावे नसलेले, वगळण्यात आलेले गरीबही असतील.

(3) **गरीबांच्या संस्थांना प्रोत्साहन** :- गरीबांसाठी जागा, आवाज व स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी, व बाहेरील एजन्सींवरील त्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठी, एसएचजी आणि त्यांचे ग्रामस्तरीय व उच्चतर स्तरावरील संघ ह्यासारख्या

गरीबांसाठीच्या सशक्त संस्था असणे आवश्यक आहे. ह्या संस्थांमुळे त्यांना अधिकार प्राप्त होतो व त्याचबरोबर, ह्या संस्था, ज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याची साधने, तसेच उत्पादन, एकत्रीकरण व व्यापार ह्यांची चालक-केंद्रे म्हणूनही काम करतात. ह्यासाठी, डीएवाय-एनआरएलएम, निरनिराळ्या स्तरांवर अशा संस्था स्थापन करण्यावर जोर देते. ह्याशिवाय, डीएवाय-एनआरएलएम, उपजीविका संघ, उत्पादकांच्या सहकारी संस्था/कंपन्या ह्यासारख्या विशेष संस्थांना इकॉनॉमीज ऑफ स्केल, पुढील व मागील जोडण्या, आणि कर्ज, तंत्रज्ञान, मार्केट्स इत्यादींमध्ये सुलभ प्रवेश इत्यादींमार्फत, उपजीविका मिळविण्यासाठी प्रोत्साहन देईल. उपजीविका संघ, गरीबांना त्यांचे सीमित स्त्रोत वाढविण्यास मदत करतील.

(4) **विद्यमान असलेले एसएचजी व गरीबांचे संघ ह्यांचे सशक्तीकरण** :- सरकारी प्रयत्न व एनजीओंच्या प्रयत्नांमधून स्थापन झालेल्या, गरीब महिलांच्या संस्था विद्यमान आहेत. डीएवाय-एनआरएलएम, गरीबांच्या सर्व संस्थांना भागीदारीच्या रितीने सशक्त करील. सरकारी तसेच एनजीओ क्षेत्रातील स्वयंसेवेला प्रोत्साहन देणा-या संस्था, अधिकतर पारदर्शकता सुरु करण्यासाठी, सामाजिक दायित्व रीतींना प्रोत्साहन देतील. एनआरएलएम व राज्य सरकारांनी विकसित केलेल्या यंत्रणांच्या व्यतिरिक्त हे असेल. एकाने दुस-याकडून शिकणे हीच, डीएवाय-एनआरएलएममधील महत्वाची प्रक्रिया आहे.

(5) **प्रशिक्षण, क्षमता निर्माण व कौशल्य निर्माणावर भर** :- डीएवाय-एनआरएलएम खात्री करुन घेईल की, त्यांच्या संस्थांचे व्यवस्थापन करणे, मार्केटशी जोडणी करणे, त्यांचा विद्यमान उपजीविकांचा सांभाळ करणे, त्यांची कर्ज घेण्याची क्षमता आणि कर्ज-पात्रता वाढविणे इत्यादींसाठी, गरीबांना आवश्यक ती कौशल्ये उपलब्ध करुन दिली जात आहेत. उद्दिष्ट केलेली कुटुंबे, एसएचजी, त्यांचे संघ, सरकारी संस्था, बँकर्स, एनजीओ आणि इतर महत्वाचे घटक ह्यांचे क्षमतावर्धन सातत्याने करण्यासाठी, बहुदिशात्मक दृष्टिकोन ठेवावा लागेल. एसएचजी व त्यांचे संघ आणि इतर एकत्रीकृत संघ ह्यांच्या क्षमता वर्धनासाठी, जाती-जमातीमधील व्यावसायिक व जाती-जमाती मधील स्त्रोत असलेल्या व्यक्तींना विकसित करण्यावर विशेष भर दिला जाईल. ज्ञानाचा प्रसार व क्षमतावर्धन अधिक परिणामकारक करण्यासाठी, डीएवाय-एनआरएलएम, आयसीटीचा भरपूर वापर करील.

(6) **फिरता निधी व समाज गुंतवणुक आधार निधी (सी.आय.एफ.)** :- काटकसर करण्याची सवय लागण्यासाठी आणि त्यांच्या दीर्घकालीन कर्ज गरजा भागविण्यासाठी, तसेच तातडीच्या उपजीविका गरजा भागविण्यासाठी त्यांनी त्यांचा स्वतःचा निधी साठवून ठेवण्यासाठी, एक प्रोत्साहन म्हणून, पात्र असलेल्या एसएचजींना एक फिरता निधी उपलब्ध करुन दिला जाईल. हा सीआयएफ एक गंगाजळी असेल आणि त्याचा उपयोग सभासदांच्या गरजा थेट भागविण्यासाठी आणि पुनर् बँक वित्त मिळविण्यासाठी कॅटॉलॅटिक भांडवल म्हणून केला जाईल. हा सीआयएफ, संघांच्या मार्फत एसएचजींना देण्यात येईल. गरीबांकडून त्यांचे स्वतःचे निधी मोठ्या प्रमाणावर साठविले जाईपर्यंत, दारिद्र्य निर्मूलनाची किल्ली, वाजवी दराने वित्त उपलब्ध असणे हीच असेल.

(7) **जागतिक वित्तीय समावेशन** :- सर्व गरीब कुटुंबे, एसएचजी व त्यांचे संघ ह्यांना पायाभूत बँकिंग सेवा देण्यापलिकडेही, डीएवाय-एनआरएलएम, जागतिक वित्तीय समावेशन मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहील. वित्तीय समावेशनाच्या पुरवठा व मागणी ह्या दोन्हीही बाजूंवर, डीएवाय-एनआरएलएम कार्य करील. त्यातून मागणीच्या बाजूने, गरीबांमध्ये वित्तीय साक्षरता आणण्यास प्रोत्साहन दिले जाईल व त्याचबरोबर, एसएचजी व त्यांचे संघ ह्यांना कॅटॉलिटीक भांडवलही उपलब्ध केले जाईल. पुरवठ्याच्या बाजूने, ते वित्तीय क्षेत्राशी समन्वय साधील, आणि माहिती, दळणवळण व तंत्रज्ञान (आयसीटी) आधारित वित्तीय तंत्रज्ञाने, बिझिनेस कॉरेस्पाँडंट्स आणि 'बँक मित्र' सारख्या समाज सहाय्यकांचा उपयोग करण्यास प्रोत्साहन देईल. त्याचप्रमाणे, ते जीवन स्वास्थ्य व मालमत्ता ह्यांची हानी झाली

असता, गरीबांना जागतिक संरक्षण देण्यासाठी प्रयत्नशील राहील. ह्याशिवाय, विशेषतः जेथे सातत्याने स्थलांतर केले जात असते अशा क्षेत्रांमध्ये प्रेषणे करण्याचा प्रयत्न करील.

(8) **व्याज अर्थसहाय्याची तरतुद** :- ग्रामीण गरीबांना त्यांचे उद्योग आर्थिक दृष्ट्या सफलताक्षम करण्यासाठी, कमी व्याज दरांचे कर्ज व तेही अनेक मात्रांमध्ये मिळण्याची गरज असते. परवडेल असे कर्ज मिळण्याची खात्री करण्यासाठी, प्रमुख वित्तीय संस्थांमधून ज्यांनी कर्ज घेतले आहे अशा सर्व एसएचजींना दरसाल 7% च्या वरील व्याजदरांसाठी डीएवाय-एनआरएलएम मध्ये अर्थसहाय्य देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(9) **निधी पुरवठ्याचा साचा** :- डीएवाय-एनआरएलएम ही एक केंद्र प्रायोजित योजना असून, ह्या कार्यक्रमाचे अर्थसहाय्य, केंद्र व संबंधित राज्ये ह्यांनी 60:40 ह्या प्रमाणात वाटून घ्यायचे आहे (90:10 सिक्कीम सह ईशान्येकडील राज्ये ह्यांचेसाठी व युटींच्या बाबतीत संपूर्णतः केंद्राकडून) राज्यांकरिता ठेवण्यात आलेले केंद्र सरकारचे वाटप, स्थूलमानाने, त्या राज्यांमधील दारिद्र्याच्या हिशेबाने वाटले जाईल.

(10) **टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी** :- गरीबांचे सामाजिक भांडवल म्हणजे, गरीबांसाठीच्या संस्था, त्यांचे नेते, समाजातील व्यावसायिक आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, समाज-स्त्रोत-व्यक्ती (म्हणजे अशा गरीब महिला की ज्यांची जीवने, त्यांच्या संस्थांच्या आधारामुळे बदलली आहेत) सामाजिक भांडवल निर्माण होण्यास सुरुवातीच्या वर्षात थोडा वेळ लागतो, परंतु काही कालानंतर ते झपाट्याने वाढत जाते. डीएवाय-एनआरएलएममध्ये गरीबांचे सामाजिक भांडवल, प्रमुख भूमिका करत नसेल तर तो लोकांचा/लोकांसाठीचा कार्यक्रमच नसेल. ह्याशिवाय, मध्यस्थीचा दर्जा व परिणाम कमी होणार नाही ह्याचीही खात्री करुन घेणे महत्वाचे आहे. ह्यासाठीच, डीएवाय-एनआरएलएममध्ये, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत डीएवाय-एनआरएलएम सर्व जिल्ह्यात पोहोचली असेल.

(11) **इंटेन्सिव्ह ब्लॉक्स** :- डीएवाय-एनआरएलएमची अंमलबजावणी करण्यासाठी घेतल्या गेलेल्या ब्लॉक्सला 'इंटेन्सिव्ह ब्लॉक्स' म्हटले जाते व त्यांना प्रशिक्षित व व्यावसायिक कर्मचारी दिले जातील व त्यात, जागतिक व तीव्र सामाजिक व आर्थिक समावेशन, उपजीविका, भागीदारी ह्याबाबतच्या कार्यकृती असतील. तथापि, उर्वरित किंवा नॉन-इंटेन्सिव्ह ब्लॉक्समध्ये, ह्या कार्यकृतींची व्याप्ती व तीव्रता मर्यादित असेल.

(12) **ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण केंद्रे (आरएसईटीआय)** :- आरएसईटीआयची संकल्पना, एसडीएमई ट्रस्ट, सिंडिकेट बँक व कॅनरा बँक ह्यांची सहकारी भागीदारी असलेल्या, व ग्रामीण विकास स्वयंरोजगार संस्थेने (आरयुडीएसईटीआय) प्रथम तयार केलेल्या मॉडेलवर आधारित आहे. ह्या मॉडेलचे उद्दिष्ट म्हणजे, बिना रोजगार असलेल्या तरुणांचे, लघु मदतीचा अनुभवयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम व त्यानंतर दीर्घ मुदतीचे सहाय्य देऊन, आत्मविश्वासयुक्त अशा स्वयंरोजगार असलेल्या उद्योजकांमध्ये रुपांतरण करणे. अशा गरज-आधारित प्रशिक्षणामुळे, प्रशिक्षण घेणा-या तरुणांमध्ये, उद्योजकाचे गुण निर्माण होतात, त्यांचा आत्मविश्वास वाढतो, अपयशाची जोखीम कमी होते व त्यांचे बदल करणारे प्रतिनीधीच तयार होतात. ह्याबाबतची निवड, प्रशिक्षण व प्रशिक्षणोत्तर पाठपुरावा ह्या सर्व टप्प्यांवर बँकांचा संपूर्ण सहभाग असतो. गरीबांसाठी असलेल्या संस्थांमधून दिसून आलेल्या गरीबांच्या गरजा, सहभागी व्यक्तींना/प्रशिक्षण घेणा-यांना, त्यांच्या स्वयंरोजगाराबाबत व उद्योगांबाबत तयार करण्यासाठी आरएसईटीआय मार्गदर्शन करतील. देशाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आरएसईटीआय स्थापन करण्यासाठी, डीएवाय-एनआरएलएम, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना प्रोत्साहन देईल.

---------------------------------------------------